# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक २४६ वा मंगळवार दि.०५ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# विकास कामासाठी १० कोटीचा निधी मंजूर रेणापूरकरांनी आ. कराड यांचे मानले आभार

लातूर दि.०४- रेणापूर शहरातील प्रभू श्रीराम मंदिर परिसर विकास, स्वामी समर्थ महाराज मंदिर सभामंडपासह विविध विकास कामासाठी तब्बल १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून रेणापूर शहरातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांच्यासह नागरिकांनी जाहीर आभार व्यक्त केले. याप्रसंगी रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

रेणापूर नगरपंचायत अस्तित्वात आल्यापासून आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर शहराकडे विशेष लक्ष देऊन आजपर्यंत वेगवेगळ्या योजनेतून कोट्यावधी रुपयाचा निधी रेणापूरच्या इतिहासात पहिल्यांदाच मंजूर करून दिला आहे. रेणापूर येथील प्रभू श्रीराम मंदिर परिसर विकासासाठी २ कोटी आणि शहरातील अंगणवाडीं सुधारणा करण्यासाठी तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी उपलब्ध करून दिला त्याचबरोबर रेणापूर नगर पंचायत अंतर्गत पोलीस स्टेशन ते मेन रोड पर्यंत नाला बांधकाम करणे १ कोटी ३० लक्ष, प्रभाग क्र. १ मध्ये नगरपंचायत ते रुपेश अकनगिरे यांच्या घरापर्यंत सी. सी. रोड व नाली करणे ८० लक्ष, प्रभाग क्र. ६ मध्ये बालाजी





मंदिर परिसरात सी. सी. रोड व नाली बांधकाम करणे ५० लक्ष, रेणापूर नगरपंचायत अंतर्गत ओमनगर येथे स्वामी समर्थ महाराज मंदिर येथे सभा मंडप बांधकाम करणे ५० लक्ष, प्रभाग क्र. २ मध्ये हणमंतवाडी तांडा येथे सभागृह बांधकाम करणे ३० लक्ष, प्रभाग क्र. ३ मध्ये प्रभु श्रीरामचंद्र मंदिर समोरील रस्ता सी. सी. रोड व नाली बांधकाम करणे ३० लक्ष, प्रभाग क्र. ५ मध्ये बळी कुरे ते सरवदे यांच्या घरापर्यंत सी.सी. रोड ब नाली बांधकाम करणे ३० लक्ष, रेणापुर नगर पंचायत अंतर्गत ईदगाह कंपाऊंड वॉल व लादीकरण करणे १ कोटी, यांप्रमाणे १० कामासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला आहे.

कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात रेणापूर येथील विविध भागातील सर्व स्थरातील नागरिकांच्या वतीने श्री गणेशाची चांदीची मूर्ती भेट देऊन यथोचित सत्कार करून जाहीर आभार व्यक्त केले याप्रसंगी भाजपाचे तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास शेख शफी, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, उज्वल कांबळे, चंद्रकांत कातळे, संतोष राठोड, उत्तम चव्हाण, मारूफ आतार, उत्तम घोडके, दिलीप चव्हाण, अंतराम चव्हाण, रमेश वरवटे, शेख अजीम, रमेश चव्हाण, सचिन सिरसकर, सुभाष राठोड, धम्मानंद घोडके, नंदकुमार बंडे, रोहित खुमशे योगेश राठोड, नागेश बस्तापुरे, मनोज चक्रे, गणेश माळेगावकर, सुरज फुलारी, पप्पू कुडके, जगन्नाथ कातळे, ज्ञानोबा सातपुते, शेख शहंशाह सोपान सातपुते, दत्ता कातळे, अमृत स्वामी, दिलीप चव्हाण, शांतिवीर क्षिरसागर, शंकर कापसे, सूर्यकांत कुडके, राजकुमार कुलकर्णी, श्रीराम पंचाळ, शेख खुद्दुस, शेख फतरू, करीम खरीद, अमिनसाब फरीद, जाहिरोद्दीन बावस्कर, शेख इस्माईल, अबूबुकर मौलाना, सुचिता क्षीरसागर, रेखा शिंदे, उषा मीठापल्ले, राधिका म्हेत्रे, श्रीशैल्य कुंभारे, रोहन पांचाळ, सुरेखा पंडित, साधू लोकरे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, अंगणवाडीच्या सेविका, मदतनीस सर्वसारातील नागरिक महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुजरातमध्ये काँग्रेसला धक्का; आणखी एका आमदाराची पक्षाला सोडचिट्ठी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रा सुरू आहे. दरम्यान राहुल गुजरातमध्ये पोहोचण्यापूर्वीच येथे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. गुजरात काँग्रेसचे नेते आणि आमदार अर्जुन मोधवाडिया यांनी तब्बल ४० वर्षांनंतर काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आहे. यापूर्वी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी देखील पक्षाचा राजीनामा देत, भाजपचे कमळ हातात धरले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी हे काँग्रेस पक्ष आणि गांधी परिवाला मोठे धक्के मानले जात आहेत. गुजरात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, आमदार अर्जुन मोधवाडिया यांनी आज सोमवारी (दि.४) आपल्या आमदारकीचा राजीनामा गुजरात विधानसभा अध्यक्षांकडे सुपूर्द केला आहे. या संदर्भातील व्हिडिओ '-छ्ख' या वृत्तसंस्थेने एक्स अकाऊंटवरून शेअर केला आहे. २२ जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात झालेल्या अभिषेक सोहळ्याला उपस्थित न राहण्याच्या काँग्रेस हायकमांडच्या निर्णयावर आमदार अर्जुन मोधवाडिया नाराज होते. त्यांनी पक्षाविरोधात वक्तव्य केल्यापासून ते काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. प्राणप्रतिष्ठेचे निमंत्रण नाकारल्याने जनभावना दुखावल्या- आ. मोधवाडिया काँग्रेसमधून राजीनामा दिल्यानंतर अर्जुन मोधवाडिया म्हणतात, जेव्हा एखाद्या पक्षाचा जनतेशी संपर्क तुटतो, तेव्हा तो जास्त काळ टिकू शकत नाही. राम मंदिर व्हावे, अशी देशातील जनतेची इच्छा होती. काँग्रेसनेही घटनात्मक निर्णयानंतर निर्णय घेतला होता की, सर्वोच्च न्यायालयाकडून आम्ही पाठिंबा देऊ. त्यानंतरही काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडून अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठेचे निमंत्रण नाकारण्यात आले. तेव्हा मी पक्षाच्या या निर्णयामुळे जनभावना दुखावल्या जातील आणि आपण असे राजकीय निर्णय घेऊ नयेत, असा आवाज पक्षांतर्गत उठवला होता. परंतु त्या निर्णयात अभाव दिसून आला. मी इतरही अनेक बाबतीत पक्षाला माझा संदेश देण्याचा प्रयत्न केला, पण मला यश आले नाही. अखेर आज मी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला असे आमदार अर्जुन मोधवाडिया यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

## लातूर ग्रामीण मधील अनेक ठिकाणच्या रस्ता कामाला आ. कराड यांच्या प्रयत्नातून मंजुरी

लातूर दि.०४- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील ७ ग्रामीण रस्त्याच्या कामासाठी त्याचबरोबर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मातोश्री ग्रामसमृध्दी पाणंद रस्ते योजनेतून १० रस्त्याच्या कामाला भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मंजूरी मिळाली असून या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्याने शेतकऱ्यासह नागरिकांच्या रस्त्याचा प्रश्न निकाली निघाला आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील रस्त्याच्या प्रश्नामुळे शेतकऱ्यासह नागरिकांना सातत्याने अडचणीला तोंड द्यावे लागत होते. रस्त्याची गरज लक्षात घेऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गिरीशजी महाजन साहेब आणि रोजगार हमी योजना मंत्री मा. संदिपानजी भुमरे साहेब यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध रस्त्यांना मंजूरी मिळाली आहे.

जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग देखभाल व दुरुस्ती लेखाशीर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील ७ ग्रामीण रस्त्याच्या कामासाठी तब्बल २ कोटी रुपयांचा निधी राज्याच्या ग्रामविकास विभाग मंत्रालयाने १ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुर केला आहे. मंजूर केलेल्या ग्रामीण रस्त्याच्या कामात कवठा केज ते (भादा) ग्रामा रस्ता कामासाठी १ कोटी, रामा २३३ ते घनसरगाव तांडा रस्ता करिता ५० लाख रुपये, कळंब रोड ते टाकळी फाटा दरम्यानच्या रस्ता कामासाठी १० लक्ष रुपये, इंदरठाणा ते नागझरी रस्ता (उच्चस्तरीय पुलाच्या बाजूचा) कामासाठी १० लाख रुपये, टाकळी शि. ते औसा रोड रेल्वे स्टेशन रस्ता १० लाख रुपये, प्रजीमा ३ ते दिघोळ तांडा रस्ता कामासाठी १० लाख रुपये आणि काटगाव कारसा रस्ता करिता १० लाख रुपये याप्रमाणे ७ कामासाठी तब्बल २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विभागातून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत तथा पांणद रस्ते योजने अंतर्गत लातूर ग्रामीण मतदार संघातील १७ किमी रस्त्याच्या मजबुतीकरण कामाला २३ फेब्रुवारी २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील ३ किलोमीटर, मोहगाव १ किलोमीटर, घनसरगाव १ किलोमीटर, माकेगाव ४.५ किलोमीटर आणि भादा सर्कल मधील भादा येथे ६ किलोमीटर आणि भेटा येथील १.५ किलोमीटर रस्त्याच्या कामाचा त्यात समावेश असून अनेक वर्षापासून अडचणीच्या ठरलेल्या या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपा पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

## तक्षशिला बुद्ध विहार येथे बुद्ध मूर्तीचा अनावरण सोहळा संपन्न.

अहमदपूर :- तालुक्यातील मौजे काळेगाव येथे तक्षशिला बुद्ध विहार या ठिकाणी थायलंड देशाच्या वतिने पूज्य भिकू खेमसिंग थेरो यांनी दान स्वरूपात दिलेली दहा फूट उंचीची आकर्षक बुद्ध मूर्ती या ठिकाणी बसवण्यात आली आहे.या बुद्ध मूर्ती चा अनावरण सोहळा दिनांक २ मार्च रोजी भिख्खू संघ व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सकाळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.भिख्खू संघास भोजनदान त्याच बरोबर उपस्थित बौद्ध उपासक उपासिका यांना भोजनदान देण्यात आले. त्या नंतर उपस्थित उपासक उपासिका यांना भिख्खू संघाकडून धम्मदेशना देण्यात आली. या कार्यक्रमांसाठी महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे उपस्थित होते.तर प्रमूख पाहूणे म्हणून आ.बाबासाहेब पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे,प्रदेश प्रवक्ते गणेश हाके पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख , इंजिनियर विश्वजीत अनिलकुमार गायकवाड ,व्ही एस पॅंथर चे विनोद खटके, डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी, गोपिनाथ जोंधळे आदीची प्रमुख उपस्थिती होती.या तथागत भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीच्या अनावरण सोहळ्यास सबंध लातूर जिल्ह्यातून त्याचबरोबर बीड-परभणी -नांदेड इत्यादी जिल्ह्यातून श्रद्धावान उपासक व उपासीका मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांची मनोगत संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. तर आभार तक्षशिला बुद्ध विहाराचे भिख्खू महाविरो थेरो यांनी केले.



## सुनेत्रावहिनी फडणवीसांवर अब्रू नुकसानीचा खटला दाखल कराच

मुंबई : अजित पवार यांनी जुलै २०२३ या महिन्यात महायुतीसह जात सत्तेत सहभागी होणे पसंत केले. त्यांच्याबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसमधले अनेक आमदारही गेले. यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाने सामनामध्ये अजित पवारांवर आणि देवेंद्र फडणवीसांवर जोरदार टीका केली आहे. एवढंच नाही तर सुनेत्रा वहिनींनी देवेंद्र फडणवीसांवर अब्रू नुकसानीचा दावा दाखल करावा असेही म्हटले आहे.राज्य बँक घोटाळ्यात देवेंद्र फडणवीस हे अजित पवार यांना तुरुंगात चक्की पिसायला पाठवणार होते. त्यांनी तो आत्मनिर्धारच केला होता. त्या घोटाळ्याचा तपास मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने गुंडाळला. अजित पवारांविरोधात पोलिसांना काहीही ठोस सापडले नाही. अजित पवारांच्या कथित बँक घोटाळ्यावर फडणवीस यांनी तांडव केले होते. महाराष्ट्राच्या जनतेचा पैसा पवारांनी आणि त्यांच्या गँगने लुटल्याचा आरोपच नाही तर आपल्याकडे पुरावे असल्याचे ते सांगत होते. आता या पुराव्यांचे काय झाले? हे पुरावे गिळून ढेकर दिला की आणखी काही केले?भ्रष्टाचा-यांना साथ देण्याची मोदी गॅरंटी फडणवीस यांनी अमलात आणली ती अशी. फडणवीसांनी शिखर बँक घोटाळ्याचे पुरावे नष्ट केले असतील तर त्या आरोपांखाली फडणवीसांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. पुराव्यांशी छेडछाड करणे हा अपराध आहे. पोलिसांनी पुरावा असतानाही कुणाच्या दबावामुळे अजित पवारांची शिखर बँक घोटाळा फाईल बंद केली असेल तर महाराष्ट्राचे गृहमंत्री आणि पोलीस आयुक्त यांना पार्टी करुन हायकोर्टात दाद मागितली गेली पाहिजे.समाजसेविका सुनेत्रा पवार यांनी त्यांचे पती अजित पवार यांची बदनामी केल्याप्रकरणी, कुटुंबास मनस्ताप देऊन काकांच्या पाठीत सुरा खुपसण्यास भाग पाडल्याच्या सबबीखाली देवेंद्र फडणवीस व त्यांच्या लोकांवर अब्रू नुकसानीचा खटलाच चालवायाला हवा. कुणीही उठायचे आणि बदनामीचा चिखल उडवायचा हे बरे नाही. असा उल्लेख सामनात करण्यात आला आहे.



# संपादकीय....

## नियमोल्लंघनाला हवी वेसण

महेश कोळी, संगणकतज्ज्ञ भारतात काम करणार्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना भारतीय कायदे आणि नियमांचे पालन करावेच लागेल आणि भारतीय संस्कृती, सभ्यता आणि परंपरेचा सन्मान करावा लागेल; पण गुगलने यासंदर्भात आश्वासन देऊनही भारत आणि भारतासंदर्भात संभ्रम निर्माण करणारी माहिती पुरविली जात असल्याचे निदर्शनास येत आहे.गुगल, फेसबुक, एक्ससारख्या कंपन्या अमेरिकी कायद्यानुसार काम करतात; पण भारतात काम करायचे असेल तर भारतीय आयटी कायद्यांच्या कक्षेतच काम करावे लागेल, हेदेखील या कंपन्यांनी ध्यानात घेतले पाहिजे. सध्या गुगलचे आर्टिफिशियल इंटिलिजन्स (एआय) 'जेमिनी'ची चर्चा आहे' पण या 'जेमिनी'वर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी खोटी आणि चुकीची माहिती दिली जात असल्याचा आरोप आहे. याबाबत केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी गुगलला (इंडिया) तंबी दिली आहे. चंद्रशेखर यांनी म्हटले आहे की, पंतप्रधान मोदी यांच्याविषयी चुकीची माहिती देत गुगलने आयटी कायद्यातील नियमांचे आणि क्रिमिनल कोडच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे.देशाच्या प्रमुखाबाबत प्रसारित केली जाणारी चुकीची माहिती, ही आयटी नियम मोडणारी आहे, असे मंत्र्यांनी बजावले आहे. मग गुगल अमेरिकेच्या अध्यक्षाबाबत चुकीची माहिती देऊ शकते का? मग याप्रमाणेही गुगलला पंतप्रधान मोदी यांच्याविषयी खोटी माहिती पुरवण्याचा कोणताही अधिकार नाही. देशाच्या प्रमुखांबाबत चुकीची माहिती देत नकारात्मक प्रसिद्धीच्या माध्यमातून 'जेमिनी'चा प्रसार करण्यासाठी घाट घातला जात असेल तर ही बाब अमान्य आहे. जेमिनी एआय हे जगातील काही प्रमुख नेत्यांसंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना चुकीची माहिती देतो आणि त्यात पंतप्रधान मोदी यांचा समावेश आहे. इतिहासातील काही गोष्टी चुकीच्या पद्धतीने सादर केल्यामुळेही गुगलच्या जेमिनी एआयला टीकेला सामोरे जावे लागत आहे. जेमिनी एआयने अनेक चुकीचे दाखले देत फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. यावर गुगलने सारवासारव केली आहे; परंतु ती बाब पुरेशी नाही. 'जेमिनी'च्या इमेज जनरेशन फिचरमध्ये निर्माण झालेल्या समस्येवर गुगल तोडगा शोधत आहे. अशावेळी 'जेमिनी'तील फोटो निर्मिती तातडीने थांबवू व लवकरच चांगली आवृत्ती नव्याने जारी करू, असे गुगलने म्हटले आहे. अर्थात, गुगलने चॅटजीपीटीचा मुकाबला करण्यासाठी नवे आर्टिफिशियल इंटिलिजन्स (एआय) मॉडेल-जेमिनीला तीन महिन्यांपूर्वी लाँच केले. एखाद्या मानवाप्रमाणे व्यवहार करण्यासाठी या टूलची निर्मिती करण्यात आली. गुगलच्या मते, जेमिनी टूल ही एखादी गोष्ट समजून घेण्यास, आकलन करण्यास, कोडिंग आणि प्लॅनिंगमध्ये अन्य मॉडेलच्या तुलनेत चांगले काम करते.कंपनीचे सीईओ सुंदर पिचाई यांनी जेमिनी लाँच करताना गुगलमध्ये एआयच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली असल्याचे म्हटले होते. जेमिनी हे गुगलचे अलीकडचे 'लार्ज लँग्वेज मॉडेल' (एलएलएम) आहे. ते 'मॅसिव्ह मल्टिटास्क लँग्वेज अंडरस्टॅंडिंग मॉडेल'वर (एमएमएलयू) आधारित आहे. 'लार्ज लँग्वेज मॉडेल' हे एक 'डीप लर्निंग अल्गोरिदम' आहे. त्याला व्यापक माहितीच्या आधारे प्रशिक्षित केले आहे. म्हणूनच त्याला लार्ज असे म्हटले जाते. अनुवाद करणे, प्रेडिक्ट करणे, शिवाय टेक्स्ट व अन्य कंटेंटला जनरेट करण्यात सक्षम आहे. 'लार्ज लँग्वेज मॉडेल'ला 'न्युरल नेटवर्क'च्या रूपातूनही ओळखले जाते. ही एक मानवी मेंदूपासून प्रेरणा घेत तयार केलेली कॉम्प्युटिंग सिस्टीम आहे. 'लार्ज लँग्वेज मॉडेल' हे प्रोटिन आराखडा समजून घेणे, सॉफ्टवेअर कोड लिहिणे यांसारख्या अनेक कामासाठी तयार करता येऊ शकते. त्याचवेळी आयटी नियमांचे उल्लंघन होऊ नये, याची काळजी घ्यायला हवी. नियमांचे उल्लंघन केल्यास त्याबाबत कडक कारवाई करण्याची पावले उचलण्याची गरज आहे.

# राजकारण जोमात, अर्थकारण कोमात !

लोकसभा निवडणुकीमुळे केंद्र सरकारप्रमाणेच राज्य सरकारनेही पुढील चार महिन्यांच्या खर्चाची तरतूद करण्यासाठी लेखानुदान तथा अंतरिम अर्थसंकल्प मागच्या आठवड्यात सादर केला. साधारणत: लेखानुदानात सरकारचा वेतन वगैरेचा अनिवार्य खर्च व सध्या सुरू असलेल्या कामासाठी आर्थिक तजवीज केली जाते. परंतु लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काही मोठ्या निर्णयाची घोषणा, अथवा सूतोवाच केले जाईल, अशी अपेक्षा होती. पण तसे झाले नाही. केवळ तीर्थक्षेत्रे, स्मारके यांना अर्थसंकल्पीय भाषणात स्थान मिळाले. बहुधा सगळे निर्णय लोकसभेपाठोपाठ येणा-या विधानसभा निवडणुकीसाठी राखून ठेवलेले दिसतायत. पण या अर्थसंकल्पामुळे राज्याची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसल्याचे चित्र मात्र समोर आले आहे.उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पात ९७३४ कोटींची महसुली तूट दाखवण्यात आली आहे. मागच्या काही वर्षांतले आकडे बघता ही तूट आणखी वाढणार असे दिसते आहे. २०२४-२५ अखेर राज्यावरील कर्जाचा बोजा ७ लाख ८३ हजार कोटींवर जाणार आहे. राज्याची वित्तीय तूट जवळपास एक लाख कोटींवर गेली आहे. राज्याच्या महसुलापैकी ५८ टक्के म्हणजे तब्बल २ लाख ८९ हजार ७७२ कोटी रुपये केवळ वेतन, निवृत्तिवेतन व व्याजावर खर्च होणार आहेत. सुधारित निवृत्तिवेतन योजना लागू झाल्यानंतर यात मोठी वाढ होणार आहे. याचाच अर्थ विकासासाठी कर्जाने निधी उभारणे व हा डोंगर वाढवण्याशिवाय पर्याय असणार नाही. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नेहमीच्या धाटणीतले उत्तर देत आर्थिक स्थितीबाबत चिंतेचे काही कारण नाही, असा दावा केला. राज्याची आर्थिक स्थिती चांगली असून आर्थिक आव्हानांना तोंड देण्याची ताकद आमच्याकडे आहे, असा दावा त्यांनी केला. कशाचेही सोंग आणता येते पण पैशाचे सोंग आणता येत नाही, असे म्हणतात. तरीही निवडणुका व राजकीय नफा-तोट्याचा विचार करून अनेकदा निर्णय घ्यावे लागतात. येणारे वर्ष तर निवडणुकीचे आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था सावरण्यासाठी कटू निर्णय घेण्याऐवजी लोकप्रिय निर्णय घेण्याचा सपाटा सुरू होईल व आर्थिक डोलारा सावरणे आणखी कठीण होणार आहे.सुधारित पेन्शन योजनेचा भार वाढणार ! तिजोरीवरील वाढणारा बोजा लक्षात घेऊन २००५ साली जुनी पेन्शन योजना बंद करण्यात आली. त्याऐवजी राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली. पण बाजारामधील चढ-उताराचा परिणाम ८० राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीवर होतो. त्यामुळे अपेक्षेपेक्षा खूपच कमी निवृत्तिवेतन मिळते. त्यामुळे जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी देशभरातील कर्मचा-यांनी आक्रमकपणे ही मागणी लावून धरली आहे. रिझर्व्ह बँकेने इशारा देऊनही काही राज्यांनी ती मान्य केली. परंतु महाराष्ट्र सरकारने याला नकार दिला होता. राज्य सरकारचे साडेसोळा लाख कर्मचारी आहेत व जुनी पेन्शन योजना लागू केली तर सरकारच्या तिजोरीवर ५० ते ५५ हजार कोटींचा अतिरिक्त भार पडेल, असे सांगून पूर्वी अर्थ खाते सांभाळणा-या देवेंद्र फडणवीस यांनी कर्मचारी संघटनांची मागणी अमान्य केली होती.पण या संघटित वर्गाच्या रेट्यापुढे त्यांनाही



माघार घ्यावी लागली. जुनी नाही, पण बाजारातील चढ-उताराची जोखीम स्वीकारणारी सुधारित निवृत्तिवेतन योजना सरकारने मान्य केली आहे. मागच्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याची घोषणा केली. या निर्णयानुसार कर्मचा-यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तिवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे. सध्या कर्मचा-यांच्या वेतनावर वर्षाला सव्वा लाख कोटी रुपये खर्च होतात. २००५ पूर्वी सेवेत आलेले ८ लाख २७ हजार कर्मचारी असून, त्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे. त्यासाठी वर्षाला ५२ हजार ६८९ कोटी रुपये लागतात. तर राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत शासनाचा हिस्सा हा ७ हजार ६८६ कोटी रुपये खर्च येत होता. त्यात केलेल्या सुधारणांमुळे हा भार आता वाढणार आहे. नगारे सुरू झाले ! लोकसभा निवडणुकीची औपचारिक घोषणा अजून झालेली नसली तरी निवडणुकीचे नगारे वाजायला सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय व राज्य स्तरावर आघाडी व युतींची समीकरणं मांडण्याचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आहेत. महाराष्ट्रात मात्र अजूनही दोन्ही बाजूला गोंधळाचे वातावरण आहे. भाजपा, शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) यांच्यातील जागावाटपाचा तिढा अजून सुटलेला नाही. कोण किती आणि कोणत्या जागा लढणार याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. एकमेकांच्या उमेदवारांना विरोध होतोय. राष्ट्रवादीच्या दिलीप मोहिते यांनी शिवाजीराव आढळराव यांना शिरूरमधून उमेदवारी द्यायला विरोध केलाय. राष्ट्रवादीच्याच सुनील शेळकेंनी मावळचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्याविरुद्ध दंड थोपटले आहेत. तिकडे रत्नागिरी-सिंधुदुर्गवरून शिवसेना-भाजपात जुंपली आहे. अनेक मतदारसंघांत हा वाद आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा गुंता अजूनही सुटलेला नाही. प्रकाश आंबेडकर महाविकास आघाडीत येणार की नाही याबाबत अजूनही गोंधळ आहे. भाजपाने १९० उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून आघाडी घेतली आहे. पण महाराष्ट्रातील एकही उमेदवार जाहीर केलेला नाही.पुढच्या आठवड्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्रात येत असून निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणार आहेत. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्राही १२ मार्चला महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे शहरात राहुल गांधी यांची सभा होणार आहे. यामुळे उमेदवार व जागांची घोषणा झाली नसली तरी निवडणुकीचे वारे वाहायला सुरुवात झाली आहे. देशाचे निवडणूक आयुक्तही पुढच्या आठवड्यात मुंबईत येणार असून, प्रशासकीय तयारीचा आढावा घेणार आहेत. १० मार्चनंतर कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने त्यापूर्वी फायली मार्गी लावण्यासाठी मंत्रालयात धावपळ सुरू आहे. आचारसंहिता उंबरठ्यावर आलेली असताना फायलीवर सही होत नसल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच गटातील दादा भुसे व महेंद्र थोरवे यांची विधानभवनातील लॉबीत हाणामारी झाल्याची चर्चा होती. दोघांनी हाणामारीचा इन्कार केला असला तरी आवाज वाढल्याचे मान्य केले. एकूण रागरंग पाहता यावेळची लोकसभेची निवडणूक रंगतदार होणार अशीच चिन्हं आहेत.

# अर्थभरारीचा अन्वयार्थ!

लोकसभा निवडणूक तोंडावर असताना सत्ताधारी भाजपला स्वत:ची पाठ थोपटून घेण्यासाठीचा आणखी एक मुद्दा मिळाला आहे. त्यात सरकारची ध्येयधोरणे व जाणीवपूर्वक प्रयत्न यांचा वाटा किती, हा संशोधनाचाच विषय आणि या घटनाक्रमाचा देशातील सामान्यांस काय फायदा हा उपप्रश्न! मात्र, सध्याच्या प्रचारकी वातावरणात ही चिकित्सा अडगळीत निपचीत पडलेली असल्याने असे प्रश्न वा उपप्रश्न उपस्थित होण्याची शक्यताच धूसर! त्यामुळे अशा प्रश्नांची शास्त्रीय चिकित्सा होण्याची अपेक्षा फोलच! असो!! तर हा मुद्दा आहे भारतीय अर्थव्यवस्थेच्या भरारीचा! ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर या तिमाहीत देशाच्या अर्थव्यवस्थेने मोठी भरारी घेतली असून देशांतर्गत सकल उत्पादनाचा दर ८.४ टक्क्यांवर पोहोचला आहे. जगातील अनेक प्रमुख अर्थव्यवस्थांचा वाढीचा वेग मंदावून त्या उसासे टाकत असताना भारतीय अर्थव्यवस्था अशी जोरदार मुसंडी मारत असल्याने साहजिकच ती जगाच्या चर्चेचा विषय ठरली आहे. या मुसंडीमुळे भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनली आहे. याचे अनेक परिणाम व फायदे भारताला होणार आहेत. चालू आर्थिक वर्ष संपेल तेव्हा देशाच्या जीडीपी वाढीचा दर किमान ७.६ टक्के असेल. तोही जगात सर्वाधिक असणार आहे. चौथ्या तिमाहीचे निकाल येतील आणि नव्या आर्थिक वर्षाला सुरुवात होईल तेव्हा देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असेल व सर्वच राजकीय पक्षांना




प्रचारासाठी मुद्यांची गरज असेल.अशा स्थितीत अर्थभरारीचा हा दिलखेचक पण सामान्यांच्या अकलनाबाहेरचा मुद्दा आयता पदरात पडल्यावर सत्ताधारी भाजप व त्यांची समाजमाध्यमी फौज त्याचा 'डंके की चोट पर' वापर करून घेणार व देश कसा अर्थसंपन्न होतो आहे याचे ढोल जोरजोरात बडवले जाणार हे उघड! मात्र, हे ढोल बडवले जाताना याच अर्थभरारीत आजही देशातील अर्ध्याहून जास्त लोकसंख्येचे जगणे ज्या कृषी क्षेत्राशी निगडीत वा अवलंबून आहे त्या कृषी क्षेत्राचा चालू आर्थिक वर्षातील वाढीचा दर उणे ०.७ टक्क्यांवर पोहोचलेला असेल, हे वास्तव मात्र सत्ताधारी अत्यंत खुबीने अडगळीत टाकतील व देश आर्थिक महासत्ता कसा बनतो आहे व आम्ही या स्वप्नात कसे रंग भरतो आहोत हेच जनतेला ठासून सांगितले जाईल. त्याचा परिणाम मतपेटीवर व्हावा हाच सत्ताधा-यांचा पूर्ण प्रयत्न असेल. मात्र, ज्या निर्मिती, खाण व उत्खनन, बांधकाम, वित्त, स्थावर मालमत्ता व सेवा क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीने अर्थव्यवस्थेने तिस-या तिमाहीत ही मुसंडी मारली त्या क्षेत्रांच्या या कामगिरीत सरकारचे धोरणकर्ते म्हणून काय योगदान आहे? भिंग घेऊन शोधले तरी सरकारचे असे काही योगदान शोधूनही सापडणार नाहीच कारण तसे ते सापडायचे तर प्रत्यक्षात ते थोडेतरी असायला हवे! ज्या क्षेत्रांनी चांगली कामगिरी केली त्यांच्या कामगिरीचा थेट संबंध हा बाजारपेठेतील मागणीशी आहे,सरकारच्या धोरणाशी नाही. बाजारपेठेतील मागणी वाढते आहे म्हणून जीएसटी संकलनाचे विक्रमी आकडे येतायत. मात्र, याचा अर्थ सामान्यांचे जीवनमान सुधारले वा ते तसे सुधारण्यासाठी सरकारने गंभीर प्रयत्न केले असा अजिबात होत नाही! ही बाजारपेठेतील मागणी वाढल्याने झालेली नैसर्गिक वाढ आहे. जिथे सरकारच्या धोरणांची व प्रयत्नांची गरज आहे व त्या कृषी क्षेत्राच्या वाढीचा दर उणे नोंदवला जातो तर व्यापार, अतिथ्य, वाहतूक, पर्यटन या क्षेत्रांची वाढ बेतासबात आहे. या क्षेत्रांना चालना देण्यासाठी सरकारच्या अनुरूप धोरणांची, प्रयत्नांची व मदतीची गरज असते त्या क्षेत्रांची वाढ या अर्थभरारीत मंदच दिसत असेल तर मग या अर्थभरारीत सरकारचे काय योगदान आहे, हे स्पष्टच होते. मात्र, त्यावर चिकित्सा करणे व त्यातून सुधारणेचे शास्त्रीय मार्ग शोधून त्याचा अवलंब करणे वगैरे या सरकारचा स्वभावच नाही. सहसा तिमाहीच्या आकडेवारीवर देशाचे पंतप्रधान प्रतिक्रिया व्यक्त करत नाहीत, ते या आकडेवारीचा उपयोग देशाची वार्षिक कामगिरी कशी सुधारता येईल यासाठी करतात.मात्र, विद्यमान सत्ताधारी त्यास अपवादच! त्यामुळे स्वत: पंतप्रधानांनी या अर्थभरारीवर आनंद व्यक्त करताना 'जीडीपी वाढीचा दर हा भारताच्या आर्थिक शक्ती व क्षमतांचे द्योतक' असल्याचा दावा केला. या दाव्यातून ते भविष्यात अर्थवाढीचा हा वेग आम्हीच कायम राखू शकतो, हे सुचवू इच्छितात! त्यामुळे आज जे अप्रत्यक्षपणे सुचविले ते उद्या प्रचारात पंतप्रधान ढोल बडवून सांगणार हे उघडच! जर खरेच देश आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असेल तर मग देशातल्या शेतक-यांना शेतमालास किमान हमीभाव द्या म्हणून वारंवार रस्त्यावर का उतरावे लागत आहे? आजही आरोग्य सुविधांअभावी सामान्यांना अकाली जीव का गमवावे लागत आहेत? शिक्षण सुविधांच्या अभावाने आजही सामान्यांच्या मुलांना खासगी शिक्षणसम्राटांच्या पिळवणुकीला गुमान सामोरे का जावे लागते आहे? आजही देशातील ८० लाख कुटुंबांना मोफत अन्नधान्य, ते ही पुढच्या तब्बल पाच वर्षांसाठी, देण्याची घोषणा याच सरकारला आवश्यक का वाटते? आजही पाणी, वीज याची वंचना व कर्जाचा विळखा यातून सुटका होण्याचा मार्ग दिसत नसल्याने लाखो शेतकरी आत्महत्या का करत आहेत? आरोग्य सेविका, आशाताई यांना किमान मानधनात वाढ करा म्हणून रस्त्यावर उतरून आंदोलने का करावी लागत आहेत?रस्तोरस्ती बेरोजगारीने निराश झालेल्या तरुणांच्या झुंडी वाढतच का चालल्या आहेत? सर्वसामान्यांना आपले जगणे सुकर झाले आहे असे का वाटत नाही? ही प्रश्नांची मालिका संपत नसेल व त्यावर लोककल्याणकारी राज्याची जबाबदारी असणा-या सरकारकडून काहीच ठोस प्रयत्न होत नसतील तर मग देशात सुबत्ता आली हे खरे कसे मानायचे? या अर्थभरा-या तत्कालीन बाजारपेठीय परिस्थितीचा तात्पुरता परिणाम हाच याचा अर्थ निघतो. असा अर्थ निघत असेल तर ही देशाच्या अर्थव्यवस्थेची निरोगी व सर्वांगीण वाढ मानता येणार नाहीच. अर्थशास्त्रीय सिद्धांतांनुसार ही वाढ म्हणजे तत्कालीन सूजच! ती कधीही उतरू शकते व अर्थव्यवस्थेचा खरा कृश व कुपोषित सांगाडा जगासमोर उघडा होऊ शकतो. आज या सुजेचे श्रेय घेणारे सरकार त्यावेळी कृश सांगाड्याची जबाबदारी घेणार का? हा खरा प्रश्न! सरकार अशी जबाबदारी स्वीकारण्यास तयार असेल तर मग आजच्या तात्पुरत्या अर्थसुजेचे श्रेय त्यांनी बिनदिक्कत घ्यावे!

# सत्यशोधक डॉ संतुजी लाड यांची १८३ वी जयंती उत्साहात साजरी

सत्यशोधक समाजाचे अग्रदुत महात्मा जोतिबा फुले यांचे सहकारी शिष्य,हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांच्या १८३ वी जयंती डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समिती समितीच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली आहे. सत्यशोधक डॉ संतुजी लाड यांच्या पुतळ्याचे दिपाने, धुपाणे पूजन करून फटकाच्या आतिषबाजीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ समाजिक कार्यकर्ते विश्वनाथ इंगळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर खिरडकर, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंग घोणे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष प्रशांत पाटील, नवनाथ आलटे, युवकअध्यक्ष लालाभाऊ सुरवसे, लातूर शहर काँग्रेस अध्यक्ष अँड किरण जाधव,तुळशीदास गंगणे, भारत धाकपाडे, माजी उपजिल्हा प्रमुख शंकर रांजणकर,डॉ संतुजी लाड चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अँड प्रदिपसिंह गंगणे, पंडित कावळे,वीर योद्धा संघटना अध्यक्ष श्रीकांत रांजणकर, समरसता मंचचे शाम बलुतंकर, लक्ष्मीकांत परांडेकर, डॉ संतोष जमदाडे, बौद्धाचार्या केशव कांबळे, माजी सभापती अजिज बागवान, कवाडे गट आर पी आय जिल्हाध्यक्ष एन डी सोनकांबळे, करीम तांबोळी, बी एस पी चे जिल्हाध्यक्ष विश्वनाथ आल्टे,जमील नाना, लातूर भांडी व्यापारी संघटनेचे संजय काथवटे, शिवशंकर फिस्के,संपादक साईनाथ घोणे, पत्रकार श्रीकांत स्वामी, काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष प्रा प्रविण कांबळे,मनीषाताई कोकणे, अँड सुहास बेंद्रे, अँड रतिकांत गंगणे, रोहित पोटभरे, प्रकाश शिंदे, प्रमोद गंगणे, दत्ता तपासे, किरण कांबळे, राम घोलप, विजयकुमार डोंगरे, नरेश बुये, राजकुमार कांबळे,डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष आकाश भिमाशंकर डोंगरे, उपाध्यक्ष अँड सुनिल फावडे, स्वागताध्यक्ष दिगंबर कांबळे, कोषाध्यक्ष आनंद पारसेवार , श्रीनिवास हांडे पाटील, प्रविण





नरवडे,रोहीत रूमने, रोहित थोरात,ताहेरभाई सौदागर, गोवर्धन गंगणे, बसव सेवा संघाचे अध्यक्ष बालाजी पिंपळे, किरण कांबळे, अविराजे निंबाळकर, दिपक गंगणे, जम्मालोद्दीन मणियार, भीम दूनगावे, श्रीकांत गंगणे,राजु बूये, पवन वंजारे,रामभाऊ जवळगे, चैतन्य फिसके, मधूकर गंगणे, प्रभू कांबळे , राजु कांबळे, कानिफनाथ गंगणे, डॉ बी डी राताळ, विकास करंजे, मकरंद कुलकर्णी, श्रीकृष्ण इंगळे,सुचिता भगवते , अचूत पाटील, बालाजी कराड आदीची उपस्थिती होती , रक्तदान व फळवाटप करण्यात आले असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे

# सारखणी मांडवी रस्त्यावर भीषण अपघात; दोघे ठार विद्यार्थ्यांची बुलेट झाडावर आदळली एक जखमी,





किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) सारखणी मांडवी रस्त्यावर दहेली गावाजवळ शनिवारी १२ विची परीक्षा देवुन दुपारी ३ च्या दरम्यान घरी जात आसताणा एका वळणावर बुलेट गाडीवर जाणाऱ्या तिंघा विद्यार्थ्यांचा भीषण अपघात झाला. असून दोघे जन ठार झाले तर एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. बारावीची परीक्षा देऊन अंजनखेड, माहूर वरून दहेली आपल्या गावा कडे जात असताना दहेली गावा नाजीकच्या वळणावर दुचाकी वरील नियंत्रण सुटल्याने प्रतिक लेंडे, कृष्णा बोंतावार, गणेश तोटावार, या विद्यार्थ्यांचा बाभळीच्या झाडावर बुलेट गाडी धडकल्याने तिघेही गंभीर जखमी झाले. वेळीच दहेली गावचे सरपंच राकेश तोटावर यांनी वाहन करून प्राथमिक उपचार करण्यासाठी दहेली तांडा येथील रुग्णालयात आणले उपचार करून तिघांनाही प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी ॲम्बुलन्स च्या साह्याने यवतमाळ येथे हलवण्यात आले यवतमाळ येथील क्रिटीकेअरच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रतिक लेंडे, कृष्णा बोंतावार यांना मृत घोषित केले. तर गणेश तोटावर या विद्यार्थ्याच्या पायाला जबर मार लागल्याची माहिती असून त्याची प्रकृती चिंता जनक आहे. अगदी गावाजवळ येऊन भीषण अपघात झाल्याने दहेली गावावर शोकाकुल वातावरण आहे. दहेली गावानजीकच्या वळणावर आज पर्यंत अनेक अपघात झाले असून या रस्त्यावर अपघात प्रवण स्थळ असे दर्शवणारे एकही फलक नसून या वळणावर दोन्ही दिशेने गतिरोधक टाकण्याची मांगणी दहेली येथील सरपंच राकेश तोटावर यांनी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देईल का असा प्रश्न याप्रसंगी उपस्थित होत आहे. सदरील प्रकरणी सिंदखेड पोलीस ठाण्याचे सपोनी सुशांत किनगे यांचे सह पोलिसांची पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे

# इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात झाले संपन्न.इरा ही शाळा शिकवणीमुक्त असून y का, when केव्हा, how कसे, या तीन तत्त्वावर चालते - संचालक रामचंद्र चामले.

लातूर / प्रतिनिधी:– लातूर शहरातील सारोळा रोड येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल येथे रविवार दिनांक ३ मार्च २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यात आले, या स्नेहसंमेलनात माजी आमदार विनायकराव पाटील व सीएमडी ऑल इंडिया रिसर्च अकॅडमी सेंटरचे डॉ. सतीश गोरे, सौ. रेखा गोरे, हरीश नागपाल, जगन्नाथ मामडगेसर, सौ विना धारीवाल, कृषी उत्पन्न बाजार समिती चाकुर चे माजी सभापती प्रशांत पाटील यांच्या आगमनाने ज्ञानाची व विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करीत ज्ञानाची ज्ञानदेवता प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचवावी म्हणून आज या विद्येच्या देवी सरस्वती प्रतिमेला दीप प्रज्वलन करून इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचा इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे प्राचार्य सौ कल्पना मुसने, संचालक मुरहरी मुसनेसह इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे शिक्षक, शिक्षिका तसेच विद्यार्थी व रुबाबदार, मनमोहक वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा पाहण्यासाठी आलेल्या पालकांच्या प्रचंड गर्दीच्या साक्षीने हा उद्घाटन सोहळा पार पाडण्यात आला. अतिथी देवो भव जपणारी आपली संस्कृती असल्याने या कार्यक्रमाला आलेले मान्यवर अतिथी मा. आ. विनायकरावजी पाटील यांचा सन्मान संचालक मुरहरी मुसने यांनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व सन्मान पत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. ज्यांच्या संकल्पनेतून ही इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलची संकल्पना उदयास आलेली आहे असे थोर विचारवंत डॉ. सतीश गोरे यांचे स्वागत व सन्मान संचालक रामचंद्र चामले यांनी केले आहे. सौ. रेखा गोरे यांचे स्वागत प्राचार्य कल्पना मुसणे यांनी केले. चाकूर माजी सभापती प्रशांत पाटील यांचे स्वागत ज्ञानोबा चामले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल ज्या जागेमध्ये वास्तु उभी राहिली आणि ज्यांच्यामुळे हा कार्यक्रम आज घडून आला ते म्हणजे जगन्नाथ मामडगे सर यांचे स्वागत व सन्मान रामचंद्र चामलेसर यांनी मोठ्या आदराने केले. तसेच आलेल्या इतर सर्व मान्यवरांचे स्वागत करून सन्मान करण्यात आला.




छाया - नितीन चालक.

या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती गायनाने करण्यात आली प्रस्ताविकात रामचंद्र चामले यांनी बोलताना आलेल्या मान्यवरांनी इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलला केलेल्या वेगवेगळ्या विविध पद्धतीने केलेल्या मदतीचे या ठिकाणी बोलून दाखवीत आलेल्या स्टार फेम सर्वांना हसवणारे हास्य कलाकार बालाजी सुळ यांचे शब्द सुमनाने स्वागत करून इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल ही शाळा मुलांना घरगुती शिकवणी लावण्याची गरज पडणार नाही या तत्त्वावर चालते, तसेच आमची शाळा ू का, ुहशप केव्हा, हु कसे या तीन तत्त्वावर चालते हे तीन शब्दच लरीश असून याच तीन तत्त्वातून घपुेश्रशवसश घेऊन विद्यार्थी बाहेर पडत आहेत त्याचबरोबर या स्नेहसंमेलनासाठी आलेल्या पालकांचे शांतचित्ताने ऐकून घेतल्याने त्यांचे स्वागत रामचंद्र चामले यांनी केले. डॉक्टर सतीश गोरे यांनी प्रथम स्वागत भाषणात बोलताना इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल संचालक, प्राचार्य कल्पना मुरहरी मुसने व शिक्षक वृंद यांना भरभरून शुभेच्छा दिल्या कारण यांनी शाळेची सुरुवात दोन विद्यार्थ्यां पासून आज ७०० विद्यार्थ्यापर्यंत ही शाळा उपलब्ध करून दिली आहे. आणि त्यातल्या त्यात पुढील काळात या ठिकाणी भव्य इमारत करून इंटरनॅशनल सर्व फॅसिलिटी उपलब्ध करून देणार असल्याचे संचालकांनी मला सांगितले आहे. इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल ही शिकवनिमुक्त शाळा असून पुढील काळात आयआयटी साठी या शाळेतूनच विद्यार्थी पुढे जातील पालकांनी आपल्या भागातून प्रत्येकी दोन विद्यार्थी या शाळेला प्रवेश देऊन सध्या ७०० असलेले विद्यार्थी पुढील काळात १५०० विद्यार्थ्यांना येत्या जुन मध्ये प्रवेश द्यावा पुढील काळात शिकवणी मुक्त व मोबाईल मुक्त शाळा करणार असल्याचे व सोबतीला कल्पना मुसणे व मुरहरी मुसने व चामले परिवार असल्याचे डॉ. सतीश गोरे यांनी सांगितले. यानंतर इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल स्नेह संम्मेलन उद्घाटक माजी आमदार विनायकराव पाटील यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांचे स्वागत आपल्या स्वागतपर भाषणात बोलताना केले. काही कामानिमित्त या स्नेहसंमेलनाला उपस्थित राहू न शकलेले सध्या मुंबईत कामासाठी गेलेले औस्याचे आमदार अभिमन्यू पवार त्यांची खूप इच्छा होती या कार्यक्रमास उपस्थिती लावण्याची परंतु त्यांनी शुभ संदेश शुभेच्छा ऑनलाईन पाठवलेल्या आहेत यात आलेल्या सर्व मान्यवरांना शुभेच्छा देऊन विद्यार्थी हा अशा वेगवेगळ्या उपक्रमातून पुढे येत असतो हा उपक्रम खूप चांगला आहे यात आपण सर्वजण भाग घेतला त्याबद्दल आपणा सर्वांना शुभेच्छा आहेत असे औसा आमदार अभिमान्यु पवार यांनी या व्हिडिओ चित्रफित मध्ये बोलताना सांगितले आहे. लागलीच स्नेहसंमेलन मेळाव्यास सुरुवात करण्यात आली प्रथम गणेश वंदना नंतर पप्पांनी गणपती आणला, गणेश आरती शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केली. फॅशन शो च्या माध्यमातून जनजागृती करत विद्यार्थ्यांनी शुभ संदेश देत फॅशन शो सादर केला असता विद्यार्थी हे टाळ्या वाजवल्याशिवाय पुढे जातच नव्हते नंतर प्रेक्षकांनी खूप टाळ्या वाजवून मुलांसोबत आनंद लुटला. यानंतर संभाजी राजे यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांनी नाटिका सादर केली, अधून मधून इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल यांच्यातर्फे जोरदार फटाक्यांची अतिषबाजी चालूच होती. इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे ज्युनिअर केजी, सीनियर केजी, फर्स्ट, सेकंड, थर्ड ते सेवन क्लास विद्यार्थ्यांनी वेलकम, फॅशन शो संदेश सादर केले. सौ. रेखा गोरे यांचा स्टेजवर केक कापून प्राचार्य कल्पना मुसने व मुरहरी मुसने यांनी वाढदिवस साजरा करून पुढील कार्यक्रमात सध्या मोबाईलवर प्रचलित असलेल्या इन्स्टा, फेसबुक, व्हाट्सअप व युट्युब वर पहायला मिळत असलेली वेगवेगळ्या चित्रपटाची गाणी डान्सिंग करीत या ठिकाणी स्टेजवर विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच सीमेवर संरक्षणासाठी छातीवर गोळ्या खाणारा जवान यांच्यावर '' ए वतन ए वतन आबाद रहे तू '' हे गाणे नाटिकेतून सादर केली. तसेच काही विद्यार्थ्यांनी शाळेत अनुभवलेले आपले विचार मांडले, पहिलीच्या विद्यार्थ्यांनी पंजाबी तुनुक तु, सड्डु नाड भांगडा नृत्य सादर केले. मराठी डीजे साँग वर विद्यार्थी विद्यार्थिनी स्टेजवर थिरकले. दुसरी व चौथीचे विद्यार्थ्यांनी संतवाणी विठ्ठल, विठ्ठल या गाण्याची चित्रफीत नृत्यातून स्वतः सादरीकरण केले. स्टँडर्ड वर्गातील विद्यार्थ्यांनी चंद्रयान हे चंद्रावर कसे पोहोचले याचं गीत नृत्यातून सादर केले यात विद्यासागर चालक यांनी केलेला अप्रतिम डान्स पाहायला आलेल्या पालकांना खुप आवडला. यानंतर माधुरी दीक्षित धक धक गर्ल यांचे आजा नचले, मेरा पिया घर आया, घागरा घागरा, पायलिया तेरी छमके रे, एक दो तीन सह इतर अनेक वेगवेगळ्या गाण्यावर नृत्य डान्स करून सादर करण्यात आले. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा इतिहास सांगणारा नाटक विद्यार्थ्यांनी सादर केला. ज्यांच्या कलाकारीमुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला असे दि इव्हेंट प्रोडक्शन चे सर्वेसर्वा लक्ष्मण सुरवसे, विविध लाईव्ह, फोटो, व्हिडिओ, स्क्रीन चे सर्वेसर्वा किरण येळनुरीकर, या कार्यक्रमाला यशस्वी रीत्या अशी ड्रेसिंग करणारे ते साईनयन ड्रेसेस चे मीनाक्षी राजकुमार रत्नपारखी, तसेच सूत्रसंचालन स्टार प्रवाह टिव्ही हास्य कलाकार बालाजी सुळ या सर्वांचे पुष्पगुच्छ शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन या सर्वांचा सत्कार करण्यात आला. इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल ची सांगता सत्यम शिवम सुंदरा हे गाणे नृत्यातून सादर करून सर्व आलेल्या मान्यवरांना उभे रहात वंदे मातरम या गीताने करीत इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न झाला.

# नियमित चालण्याचा आणि रोगप्रतिकारक शक्तीचा संबंध काय?

हल्ली प्रत्येक कुटुंबामध्ये एक तरी वाहन ( मोटर/ दुचाकी ) असते. त्यामुळे जवळ जायचे असेल तरी गाडी किंवा स्कूटर वापरली जाते. विविध ॲप्समुळे सर्व गोष्टी घरी येतात आणि बाजारात फिरण्याची गरज पडत नाही. त्यामुळे चालण्याचा व्यायाम कमी होतो. तुमचे वजन वाढते आहे किंवा तुम्ही हृदयरोगाने ग्रस्त आहेत किंवा तुम्हाला ताणतणाव जास्त आहे, तर तुम्ही नियमित चालायला सुरवात करा – तुमचे हे त्रास दूर पळतील.किमान अर्धा तास तरी चाला दररोज ३० मिनिटे चालायला जाणे हा शरीर आरोग्यसंपन्न ठेवण्याचा साधा, सोपा, बिनखर्चिक व बिनधोक उपाय आहे. कुणी मित्र– मैत्रिण बरोबर असेल तर चालणे आनंदी होते म्हणून चांगली संगत बघा. कंटाळा टाळण्यासाठी नवनवीन किंवा वेगवेगळ्या मार्गावर चाला. सुरुवातीला कमी वेळ अंतर चालून हळुहळू सकाळ– संध्याकाळ ३० मिनिटे चालायला लागा. आपण रोज किती चालतो ते आपण आपल्या मोबाइलवर किंवा पेडोमीटर वर तपासू शकतो. शक्यतो दिवसाला ६०००– ८००० पावले चालायला पाहिजे.चालण्याचे फायदे १. हृदयाचे कार्य व्यवस्थित सुरु राहते, रक्ताभिसरण सुधारते व रक्तदाब नियंत्रणात राहतो. २. वाढत्या वयात आपले स्नायू कमजोर होतात. चालण्याने या स्नायूंमध्ये जास्त ताकद येते. हाडांमधील ठिसूळपणा कमी होतो.३. रोजच्या चालण्याने पचनशक्ती सुधारते. जेवल्यानंतर शतपावली करण्याचे हेच कारण आहे. ४. चालण्याने फुप्फुसाची क्षमता वाढते. शरीराला जास्त प्रमाणात प्राणवायू उपलब्ध होतो.तुमची कार्य क्षमता वाढते.५. चालणे या व्यायाम मुळे शरीराची आणि मनाची मरगळ निघून जाते. मनातील ताण तणाव, नैराश्य कमी होते. तुमचा मूड चांगला राहतो.६. चालण्याने मेंदू व मज्जासंस्था रिलॅक्स होतात. विचारांना चालना मिळते. स्मृतिभ्रंश व वृद्धत्व अश्या आजारापासून चालणे तुम्हाला दूर ठेवते.७.. चालण्याने आपली प्रतिकारशक्ती वाढते जेणे करून आजाराशी लढणे सोपे जाते.८. बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह होण्याचे



प्रमाण वाढले आहे. रोजच्या चालण्याने मधुमेहासारख्या आजाराला दूर ठेवले जाते. मधुमेह असल्यास रक्तातील साखरेची पातळी योग्य व समतोल ठेवण्यास फायदा होतो. वजन आटोक्यात येण्यासही मदत होते.९. चालण्याच्या सवयीमुळे अनेक नवनवीन मित्र जोडले जातात, मॅरेथॉन, वॉकेथॉन सारख्या शर्यतीत भाग घेऊन जीवन आनंदाने भरून येते.चालताना काय खबरदारी घ्यावी ?१. चालताना तुमचे डोके वर आणि नजर समोर असावी. सतत खाली जमिनीकडे पाहून चालू नये.२. पाठ, मन, खांदे सैल ठेवावेत. पोक काढून चालू नये. ताठ चालावे.३. चालताना दोन्ही हात मागे पुढे करणे ही एक चांगली सवय आहे.४. पाऊल पुढे टाकताना प्रथम टांच टेकवली जावी व नंतर बोटे टेकवावीत.५. सिमेंटच्या रस्त्यांपेक्षा मातीचे व गवताचे मार्ग चालण्यास चांगले असतात.६. चालताना चांगले मऊ पण मजबूत तळ असलेले स्पोर्ट्स शूज वापरावे. त्यामुळे पायांच्या स्नायूंना इजा पोहोचत नाही. ७. चालताना पिण्यासाठी पाण्याची बाटली सोबत ठेवावी.८. कपडे सुटे, सैलसर व गडद रंगाचे असावेत.९. कुठल्याही व्यायाम प्रकारात वॉर्म अप किंवा प्रथम थोडे हळू चालून स्नायू मोकळे झाले की भरभर चालावे ज्यामुळं जास्त उष्मांक वापरले जातील. १०. कुठल्याही आजारानंतर चालताना आपल्या अस्थिव्यंग तज्ज्ञाचा आणि फिजिओथेरपिस्टचा सल्ला घेऊन काही पावले चालून सुरुवात करावी. ११. तरुणांनी चालण्याबरोबर सायकल चालवणे, पोहणे, धावणे इत्यादी स्नायूंना बळकटी देणारे व्यायाम करावेत. चालण्यापूर्वी योगासने केल्याने स्नायूंना अधिक लवचिक करता येईल. चालण्याचा व्यायाम नियमित करत राहणे व प्रेरित असणे आवश्यक असते. मित्र किंवा एखाद्या वेळी कुत्रा घेऊन फिरायला निघा. चालण्याने मित्रांबरोबर घनिष्ठ मैत्री होते. वेळ कमी असल्यास घरच्या घरी किंवा सोसायटीमध्ये रात्री जेवल्यानंतर किंवा सकाळी अर्धा तास तरी चालावे.शहरात एकत्र चालणाऱ्यांचे गट असतात. किंवा हायकिंग / ट्रेकिंगच्या गटाबरोबर जाण्यातही मजा असते. थोडक्यात चालण्याचे एवढे सारे फायदे मिळवण्यासाठी तुम्ही नियमित चालायला सुरुवात करावी. त्यासाठी स्वयंप्रेरित होऊन चालण्यासाठी खास बूट आणून तयार होऊन चालायला निघा. टीव्हीवरील करमणुकीपेक्षा हे नक्कीच जास्त आनंददायी होईल. मग करणार ना सुरुवात?

# गरोदर महिलांनी सनस्क्रीन वापरावे का? डॉक्टर काय सांगतात

गर्भधारणा हा निःसंशयपणे स्त्रियांसाठी आनंदाचा काळ असतो; परंतु गरोदरपणात स्त्रियांना स्वतःची विशेष काळजी घ्यावी लागते. आईच्या प्रत्येक कृतीचा पोटातील बाळावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या काळात शरीर आणि एकंदरीतच पूर्ण आरोग्याची पूर्वीपेक्षा जास्त काळजी घेण्याची गरज असते. तसेच बरीच खबरदारीही घ्यावी लागते. गरोदरपणात महिलांनी खाण्यापिण्याच्या सवयींपासून ते उठण्या–बसण्यापर्यंत अनेक गोष्टींबाबत स्वत:ला सांभाळणे महत्त्वाचे ठरते.गरोदरपणाचा काळ हा स्त्रीच्या आयुष्यातील अतिशय महत्त्वाचा काळ असतो. या काळात त्यांना अनेक शारीरिक आणि मानसिक बदलांना सामोरे जावे लागते. त्यामुळेच या काळात महिलांना त्यांच्या आरोग्याची अधिक काळजी घ्यावी लागते. गरोदरपणात त्वचेचीही विशेष काळजी घ्यावी लागते. गरोदरपणात महिलांनी सनस्क्रीन वापरावे का? याच विषयावर डॉ. आंचल पंथ यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.मनोज जरांगेंच्या 'एन्काऊंटर'च्या आरोपावर देवेंद्र फडणवीसांचं मोठं भाष्य; म्हणाले, पोलिसांना योग्य मनोज जरांगेंची भावना प्रामाणिक होती तेव्हा सरकार सोबत होतं, पण आता, मुख्यमंत्र्यांचा थेट इशारा!डॉक्टर पंथ म्हणतात, गर्भधारणेचा काळ हा प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील एक सुंदर आणि महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात त्वचेचे सौंदर्य टिकवून ठेवणे खूप गरजेचे असते. गर्भावस्थेत स्त्रियांना खाण्यापिण्यापासून ते शरीर व त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. या अवस्थेत आपल्याला अनेक शारीरिक व मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते. या काळात महिलांना विशेष काळजी घ्यावी लागते.तसेच, केसांना रंग देऊ नका म्हणजे केसांना रंग देणे टाळणे चांगले. विशेषत: पहिल्या तिमाहीत; ज्यामध्ये गर्भधारणेच्या सुरुवातीच्या तीन महिन्यांचा समावेश होतो.

# मनपाचे शिलकी अंदाजपत्रक सादर विविध मूलभूत गरजांसाठी मोठी तरतूद

लातूर/प्रतिनिधी :– लातूर शहर महानगरपालिकेचे सन २०२३–२४ चे सुधारित आणि २०२४–२५ चे मूळ अंदाजपत्रक मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सोमवार दिनांक ४ मार्च रोजी जाहीर केले.आयुक्तांनी सादर केलेल्या या शिलकी अंदाजपत्रकात विद्युत विभाग,बांधकाम विभाग, आरोग्य विभाग तसेच पाणीपुरवठा विभागासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे. आयुक्त मनोहरे यांनी सादर केलेल्या या अंदाजपत्रकात पालिकेला यावर्षी ८३९ कोटी ८३ लक्ष रुपये उत्पन्न अपेक्षित असून या वर्षात ८३९ कोटी ५८ लक्ष रुपये खर्च होणार आहे.

यावर्षी मनपाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात विद्युत विभागातील साहित्य खरेदी व देखभाल दुरुस्तीसाठी ४० लाख रुपये तसेच पथदिवे व वीज बिलासाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.शहरात एलईडी दिवे बसवण्यासाठी ५० लाख तर ट्रॅफिक सिग्नल देखभाल व दुरुस्तीसाठी १५ लाख रुपयांची तरतूद मनपाने केली आहे. रुग्णालय व दवाखान्यांसाठी ३१ लाख खर्च अपेक्षित आहे. मोकाट जनावरांच्या बंदोबस्तासाठी कोंडवाड्यावर ६६ लाख ५० हजार रुपये खर्च केला जाणार आहे तर सार्वजनिक उद्यानासाठी एक कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बांधकाम विभागात रस्ते व गटार दुरुस्तीसाठी दोन कोटी, शैक्षणिक विषयासाठी दोन कोटी ७४ लाख ८० हजार रुपये तर ग्रंथालयांसाठी दोन कोटी २४ लाख २० हजार रुपयांची तरतूद



करण्यात आली आहे. अपंग कल्याण निधी महिला व बालकल्याण तसेच मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी अंदाजपत्रकाच्या पाच टक्के म्हणजे प्रत्येकी ६६ लाख ७३ हजार ४४३ रुपये तरतूद केली गेली आहे.नवीन रस्त्यांसाठी दोन कोटी रुपये, नवीन गटारांची कामे व दुरुस्तीसाठी दोन कोटी तसेच मान्यवरांचे पुतळे व कमानी उभारणे तसेच त्याची निगा राखण्यासाठी २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.पंपिंग केंद्रावरील साहित्य खरेदीसाठी १५ लाख रुपये,नवीन पाईपलाईनसाठी ५० लाख रुपये तर पाणीपुरवठा योजनेसाठी ही ५० लाख रुपये तरतूद मनपाने केली आहे.

पालिकेला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नामध्ये केंद्र शासनाच्या विविध अनुदानाचा वाटा ३५ टक्के तर राज्य शासनाकडून होणारी भांडवली जमा १७ टक्के अपेक्षित आहे.त्या खालोखाल कर्ज व निधीच्या माध्यमातून ११ टक्के, मालमत्ता पासून होणारे उत्पन्न ९ टक्के, विविध अनुदाने व अंशदानामधून सात टक्के तर पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून सहा टक्के उत्पन्न अपेक्षित आहे. मनपाला मिळणाऱ्या करामधूनही सहा टक्के उत्पन्न गृहीत धरण्यात आले आहे.असाधारण ऋण व निलंबन जमा मधून पाच टक्के तसेच विशेष अधिनियमाखाली होणाऱ्या वसुलीतून दोन टक्का रक्कम जमा होणार आहे.

या वर्षात पालिका केंद्र शासनाचे विविध अनुदान खर्च करणार असून त्याचे प्रमाण ३३ टक्के आहे. त्या खालोखाल राज्य शासनाच्या भांडवली खर्चासाठी १९ टक्के खर्च होणार आहे.कर्ज व निधीसाठी ११ टक्के, असाधारण ऋण व निलंबन लेखेसाठी सहा टक्के खर्च होणार आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागासाठी पाच तर महसुली भांडवली खर्चासाठी चार टक्के खर्च केला जाईल.या खालोखाल तीन टक्के संकीर्ण खर्च,सार्वजनिक सुरक्षिततेसाठी एक टक्का खर्च होणार आहे.

आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी अंदाजपत्रक सादर करताना मुख्यलेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य लेखापरीक्षक कांचन तावडे, लेखाधिकारी, समद शेख यांच्यासह पालेकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## बूद्ध विहार हे धम्माच्या प्रसाराबरोबरच ज्ञान प्रसाराचे व अभ्यासाचा केंद्र बिंदू असला पाहीजे भिमराव आंबेडकर

लातूर:...भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भिमराव आंबेडकर यांनी राजा शूध्दोधन बूद्ध विहारास भेट देऊन नवीन झालेल्या विहाराची पाहाणी केली यावेळी तथागत भगवान गौतम बूद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे धूपाने व दिपाने पूजन केले. यावेळी भिमराव आंबेडकर यांचे स्वागत राजा शूध्दोधन चँरिटेबल ट्रस्ट च्या वतीने व महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी उपासक, उपासिका यांना मार्गदर्शन करत असताना म्हटले कि बूद्ध विहारात धम्माच्या प्रसार बरोबरच ज्ञानाचा व अभ्याशिकेचे केंद्र बिंदू झाले पाहीजेत असे मत व्यक्त केले.राजा शूध्दोधन चँरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष आनंद सोनवणे यांनी बूद्ध विहाराचा वरचा मजल्यावर परिसरातील विद्यार्थींना मोफत अभ्यासिकेचे नियोजन करण्यात येणार आहे अशी माहिती दिली त्या अभ्यासिकेचे उद्घाटन भिमराव





आंबेडकर यांच्या हस्ते करण्यासाठी त्यांचा कडे वेळ मागीतला या कार्यक्रमाला मी नक्की येणार आहे असे सांगितले. यावेळी परिसरातील महिलांनी साहेबांचे स्वागत फूलांच्य वर्षाव करुन केला.यावेळी उपस्थित राजा शूध्दोधन चँरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष आनंद सोनवणे,सचिव विक्रम चिकाटे,गौतम सूर्यवंशी,सूर्यकांत दांडे,विशाल कांबळे,हेमंत जाधव,राजकूमार राऊत,दगडू साळवे,विनोद दांडे,राजू चिकाटे,वंचितचे सचिन गायकवाड ,भिम आर्मीचे विनोद कोल्हे,व परिसरातील महिला मंडळ वा भारतीय बौद्ध महासभेचे लातूर शाखेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते...

## अजितदादांची ‘राष्ट्रवादी’ अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणूक लढणार

नवी दिल्ली, : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट आता आपला मोर्चा महाराष्ट्राबाहेरही वळवण्याच्या प्रयत्नात आहे. पुर्वोत्तर भारतात आगामी लोकसभेसह अरुणाचल प्रदेश आणि काही राज्यातील विधानसभा निवडणुका लढवणार असल्याची घोषणा आज अजित पवार गटाच्या वतीने करण्यात आली. अरुणाचल प्रदेशात लोकसभेसाठी केंद्रीय मंत्री किरेण रिजिजू यांची उमेदवारी भाजपने घोषित केली आहे. असे असतानाही अजित पवार गट निवडणूक लढण्यास इच्छुक आहे. यानिमित्ताने अजित पवार गट पक्षाचा राष्ट्रीय दर्जा मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या दिल्लीस्थित कार्यालयात पक्षाचे सरचिटणीस आणि माजी केंद्रीय मंत्री सुबोध मोहिते यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मागच्या २५ वर्षांपासून देशात काम करत आहे. जात, धर्म, भाषेवर आधारित आमचा पक्ष काम करत नाही तर विकासावर काम करतो. आगामी लोकसभेसोबतच अरुणाचल प्रदेशची विधानसभा निवडणूक होणार आहे. यामध्ये पूर्ण ताकदीने अरुणाचल प्रदेशात निवडणूक लढणार आहोत. आजच्या बैठकीत अरुणाचल प्रदेश विधानसभेतील ३० जागांवर चर्चा करण्यात आली. यातील १८ ते २० आमदार निवडून आणण्यासाठी आम्ही काम करणार आहोत, असेही ते म्हणाले.

## मुस्लिम समाजाच्या सामूहिक विवाह सोहळ्यात, ३३ जोडपे विवाहबद्ध,




किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) रहेनुमा ए. कारवाँच्या वतीने १ मार्च २०२४ सकाळी १० वाजता एन.के. गार्डन येथे मुस्लिम समाज सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला. या विवाह सोहोळ्यात एकून ३३ जोडपे विवाह बध्द झालीत सर्व जोडप्याचा विवाह काजी शब्बीर मोलाना यांनी लावला मुस्लिम विवाह सोहोळ्याचे आयोजक त्नजीम रहेनुमा ए कारवाँ चे सर्व स्वयंसेवक तब्बल १२ वर्षा पासून परिश्रम घेत आहेत. कारवाँ ग्रूपने १२ वर्षामध्ये आज तागायत ३८० जोडपी विवाहब्धद केली आहे. या मेळाव्याप्रसंगी कारवाँचे सर्व स्वयंसेवक व मोलाना धर्म गुरू व तसेच लोकप्रतीनिधी माजी आमदार. प्रदिप जि नाईक, माजी नगराध्यक्ष ईसाखान , माजी नगराध्यक्ष निसार खान, माजी जि.प. उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, नगर सेवक जहीरोद्दीन खान माजी नगराध्यक्ष साजीद खान, माजी नगराध्यक्ष के मूर्ती, माजी नगराध्यक्ष अरूण कारवा आळणे, शिवसेना शिंदे गटाचे अजय कदम, बाबा भाई एग्रो पाटील, राष्ट्रवादी नेते राहुल नाईक, बालाजी बामणे, माजी नगर सेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## केईएम रुग्णालयात कोव्हिड काळात सेवेत रुजू केलेले बहुउद्देशीय रोजंदारी कामगारांचा पगार अखेर रखडला.

मुंबई/ शहामत शेख आणीबाणीच्या कोराना काळात पालिकेच्या रुग्णालय प्रशासनाच्या वतीने सेवेत रुजू करण्यात आलेले बहुउद्देशीय रोजंदारी कामगाराचा वेळेत पगार होत नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार या कामगारांना गेल्या तीन महिन्यांपासून हक्काच्या पगारा पासून वंचित आहे. हा तिढा पालिका व रूण्यालय प्रशासन तर्फे सुटेल का ? असा प्रश्न सेवेत रुजू असणाऱ्या बहुउद्देशीय रोजंदारी कामगराकडून केला जात आहे. यावर योग्य निर्णय घेऊन हा प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे. आणीबाणीच्या कोव्हीड काळात सर्वत्र शुकसूकाट असताना कोरणा योद्धा म्हणून याकडून रुग्णालयाचे स्वच्छता राखणे शौचालय साफ करणे,रुग्णाची देखभाल करणे, व मदतणीस म्हणून सेवा देणे, अशा विविध प्रकारची कामे करवण्यात आले. पालिकेचा लेखा विभाग आणि रुग्णालय प्रशासन बहुउद्देशीय रोजंदारी कामगार मात्र बोनस व पागरा पासून वंचित राहिला आहे. त्यामुळे मुनसिपल यनियन ने मोठ्या संख्येने लेखापाल कार्यालयावर धडक देण्याचा इशारा दिला आहे. या कामगारांना बोनस देण्याची घोषणा नोव्हेंबर महिन्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या बाबतच्या परिपत्रकावर पालिका आयुक्त इकबाल सिंह चहल यांनी स्वाक्षरी केली. मात्र या रोजंदारी कामगारांना अद्यापही बोनस मिळाला नाही केईएम ,नायर व शिव या पालिका रुग्णालयात सुमारे एक हजार रोजंदारी व बहुउद्देशीय कामगार काम करत आहेत. यांना पाच हजार बोनस जाहीर झाले आहे. अद्याप यांना मिळाला नाही. यांना विलंब न लावता पगार व बोनस देण्यात यावा अशी मागणी या कामगारांकडून जोर धरू लागली आहे. यावर पालिका व रुग्णालय प्रशासन ठोस निर्णय घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात यावे अन्यथा आमच्यावर कायम उपासमारीची वेळ येईल,असा प्रश्न केला जात आहे. त्यामुळे मुन्सिपल मजूर युनियन अधिष्ठाता व उपप्रमुख रुग्णालये यांच्या कार्यालयावर येत्या बुधवारी ६ मार्च रोजी धडक देण्याचे ठरवले आहे. अशी माहिती युनियनचे सहाय्यक सरचिटणीस प्रदीप नारकर यांनी दिली.

## स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात शेतीचे ऑडिट झाले नाही – दिपक इंगळे


मुरूड/ महेंद्र आल्टे : भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली उद्योग व कंपनीची ऑडिट दरवर्षी केले जाते कारण ते नफ्यात चालतात परंतु शेती हा व्यवसाय तोट्यात चालणारा असल्यामुळे शेतीचे ऑडिट कोणीही केले नाही असे उद्गार राष्ट्रीय किसान मोर्चाचे राज्याध्यक्ष दिपक इंगळे यांनी काढले. मुरुड येथील संभाजी महाविद्यालयात समाजशास्त्र व लोकप्रशासन विभागाच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम होते विचार मंचावर बाळराजे इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण शेतकऱ्याला न्याय देणारे होते म्हणून शिवाजी महाराजांच्या काळात एकही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली नाही. परंतु आजच्या शासनाचे शेतीविषयक धोरण शेतकऱ्यांच्या विरोधी असल्याने वर्तमान काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाली आहे.अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी देखील आजचे राज्यकर्ते छत्रपती शिवरायांच्या नावाने कारभार करतात त्यांच्या




नावाचा उदो उदो करतात परंतु महाराजांचे कोणतेही धोरण अंमलात आणले जात नाही त्याचा सर्वात वाईट परिणाम शेतकऱ्यांवर होतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीकॉम प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु.पठाण तब्बू तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गायकवाड एम.बी. यांनी केले कार्यक्रम यशस्वीतीसाठी प्रा. डॉ. गोरे बी. एम., प्रा.डॉ.चावरे एम.व्ही., प्रा. पैठणकर एन.एल यांनी परिश्रम घेतले शेवटी कार्यक्रमाचे आभार बी. कॉम. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु.साखरे प्रिया यांनी मांडले. कार्यक्रमास प्रा. सुर्यवंशी आबाजी, प्रा.डॉ. तहेसीनबी अत्तार, प्रा.पुष्पमाला फड यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरुणांना रोजगार मिळू नये ही मोदींची गॅरंटी

नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष कंबर कसून तयारीला लागले आहेत. अनेक पक्षांनी उमेदवारी यादी जाहीर केली आहे. आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी तीव्र होताना पाहायला मिळत आहेत. काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा सुरू आहे. देशातील बेरोजगारीवरून राहुल गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट करत केंद्र सरकारवर टीका केली.देशातील तरुणांनो, एक गोष्ट लक्षात घ्या! नरेंद्र मोदींचा हेतू रोजगार देण्याचा नाही. नवीन पदे निर्माण करणे तर दूरच, केंद्र सरकारच्या रिक्त पदांवरही भरती केली जात नाही. केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या आकडेवारीचा विचार केला तर ७८ विभागांमध्ये ९ लाख ६४ हजार पदे रिक्त आहेत. महत्त्वाच्या खात्यांवर नजर टाकली तर रेल्वेत २.९३ लाख, गृह मंत्रालयात १.४३ लाख आणि संरक्षण मंत्रालयात २.६४ लाख पदे रिक्त आहेत, असा दावा राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये केला आहे. १५ प्रमुख विभागांमध्ये ३० टक्क्यांपेक्षा जास्त पदे का रिक्त आहेत याचे उत्तर केंद्र सरकारकडे आहे का? गॅरंटीचे खोटे



दावे करणा–या पंतप्रधानांच्याच कार्यालयात मोठ्या प्रमाणात अत्यंत महत्त्वाची पदे का रिक्त आहेत? कायमस्वरूपी नोक–या देणे हे ओझे समजणारे भाजपा सरकार सातत्याने कंत्राटी पद्धतीला प्रोत्साहन देत आहे, जिथे ना सुरक्षा, ना सन्मान, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. नोकरी तरुणांचा हक्क रिक्त पदे हा देशातील तरुणांचा हक्क असून, भरती प्रक्रियेसाठी आम्ही ठोस योजना तयार केली आहे. भारताचा संकल्प आहे की, आम्ही तरुणांसाठी नोक–यांचे बंद दरवाजे उघडू. बेरोजगारीचा काळा काळ दूर होऊन तरुणांच्या भाग्याचा सूर्योदय होणार आहे, असा विश्वास राहुल गांधी यांनी व्यक्त केला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE